## ॥ श्रीगुरुचरित्र  शब्दार्थ चर्चा ॥

### अध्याय  अकरावा       (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

नमस्कार,

श्रीगुरुचरित्रातील ओव्यांचा योग्य अर्थ प्रयत्न  :-

वाचकांनी समर्पक मते कारणमीमांसेसहित

pratisaadasg@gmail.com    वर

आपल्या नाव पत्त्यासहीत कळवावीत ही विनंती.

कळावे,

'श्रीगुरुचरित्र आशय – निधी'

**ओवी क्रमांक :  ३०, ४०**

## ॥ श्रीगुरुचरित्र  शब्दार्थ चर्चा॥

### अध्याय  अकरावा      (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :**                    **ओवी क्रमांक  ३०**

'शालग्रामदेव' म्हणत। जन्मनाम झालें ख्यात।
नाम 'नरहरी' ऐसें म्हणत। उच्चार केला धर्मकर्मे॥ ३० ॥

**गद्यरुप :-**

'शालग्रामदेव' म्हणून जन्मनाव प्रसिद्ध झाले. समाजाच्या चालीरितीनुसार, (व्यावहारिक नाव म्हणून )'नरहरी' असे म्हणून (जन्मदात्या पित्याने) उच्चार केला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| ख्यात= प्रसिद्ध | धर्म = चाल (समाजाच्या चालीरिती) |
| कर्म= करणे | |

शालग्रामदेव शब्दार्थ :-

## अध्याय  अकरावा      (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

शालग्रामदेव हे श्रीविष्णुचे नाव आहे. शालग्राम म्हणजे गंडकी नदीतला वाटोळा दगड होय. ह्या दगडास शाळीग्राम, शलाग्राम असेही म्हणतात.

काळी गंडकी ही हिमनदी तिबेटसीमेजवळील नेपाळ मधील मस्तांग जिल्ह्यातील न्हुबीन हिमालय पर्वतरांगांमधून ६२६८ मीटर उंचीवरुन उगम पावते. नेपाळमधील धवलगिरी आणि अन्नपुर्णा ह्या दोन्ही  नद्या हिमालय पर्वतरागांमधून  वाहतात.  नेपाळमधील देवीघाटापासून पुढे जाणाऱ्या ह्या नदीच्या प्रवाहास नेपाळमध्ये नारायणी नदी असे म्हणतात ह्या नदीचा पुढील मार्ग भारत नेपाळ सीमेवरील त्रिवेणी या ठिकाणी भारतातील बिहारराज्यात प्रवेश करतो. ह्या नदीस भारतात गंडकी नदी असे म्हणतात. ही नदी  पुढे भारतातील बिहार राज्यातील पाटणा जवळील सोनपूर येथे गंगा नदीस येऊन मिळते. सोनपूर ह्या ठिकाणास ‘हरीहरक्षेत्र’ असे नाव

आहे.

गंडकी ही नदी हिमालयपर्वत निर्मितीच्या आधीपासून, पृथ्वीवरील नदी आहे. प्राचीन काळी नेपाळमधील धवलगिरी व अन्नपूर्णा ह्या पर्वतरांगांच्या ठिकाणी घनदाट जंगल असल्याने ह्या भागास शाल (वृक्ष) गिरी (पर्वत) असे नाव होते शालगिरी ह्या जंगलभागात हे दगड नदीपात्रात मिळाल्याने येथील गावास शालग्राम हे नाव पडले गंडकी नदीतील हे दगड **शालग्राम, शाळीग्राम, शलाग्राम** ह्या नावाने प्रचलित झाले.

शालग्राम हे दगड गुळगुळीत वाटोळे काळ्या रंगाचे असतात निळ्या हिरव्या पांढऱ्या रंगातील शालग्राम दगड क्वचित मिळतात. काही शालग्राम दगडांवर शंख, चक्र इत्यादी नैसर्गिक आकृती आढळतात.

शालग्राम हा मुलतः जीवाश्म आहे. जीवाश्म म्हणजे हजारो

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेला जीव आता शीलारुपात दगडरुपात असणारा प्राणी किंवा वनस्पती किंवा त्यांचा भाग होय.

हिमालय पर्वत निर्मितीत ह्या भागातील पाण्याच्या तळाशी असणारा गाळ वरती आला. वर आलेल्या ह्या गाळातील जीवाश्म शालग्राम दगडांच्या रुपात गंडकी नदीत मिळतात. हे शालग्राम हिमालय निर्मितीपूर्वी (लाखोवर्षांपूर्वी) अस्तित्वात असलेल्या जीवसृष्टीचे अवशेष होत.

ह्या भागात मिळालेल्या शाळीग्राममध्ये शार्क माश्याचा दात जीवाश्म रुपात मिळालेला आहे. हा जीवाश्म हिमालय निर्मितीपूर्वी ह्या भागातील समुद्र अस्तित्वाचा पुरावा म्हणता येईल.

पुराणांमध्ये शालग्राम ह्या दगडास विष्णुरुप म्हटलेले आहे. श्री आद्य शंकराचार्य यांनी विष्णुरुप शालग्राम व

अध्याय  अकरावा      (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

तुलसी यांची पूजा म्हणजे श्रीकृष्ण व तुळस यांची पूजा करण्याची प्रथा सुरु केली.

---

ओवी :                         ओवी क्रमांक ४०

सांगती जाण ज्योतिषी। आराधावें कुलदेवतेसी।
अर्कवारी अश्वत्थपर्णेंसीं। अन्न घालावें तीनी वेळां॥ ४० ॥

गद्यरुप :-

जाणकार ज्योतिषी सांगत कुलदेवतेची आराधना करावी. अर्कवारी पिंपळपानाचे तीनवेळा अन्न घालावे.

शब्दार्थ :-

# ॥ श्रीगुरुचरित्र  शब्दार्थ चर्चा ॥

## अध्याय  अकरावा      (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | | |
|---|---|---|
| जाण= जाणणारा | अर्क= सूर्य, औषधाचा द्रवरुप सत्त्वांश | |
| वारी= साठी | अश्वत्थपर्ण= पिंपळ पान | अन्न= भक्ष्य, खाद्य, खाण्यास योग्य |

### अर्कवारी  शब्दार्थ  :-

अर्क ह्या शब्दाच्या दोन अर्थातून सदर ओळीचे दोन अर्थ ध्वनित होतात.

१) अर्क= औषधाचा द्रवरुप सत्त्वांश तसेच अन्न म्हणजे खाण्यास योग्य. एकवर्षीय बाळाला खाण्यास योग्य चाटण असते.

अर्कवारी अश्वत्थपर्णेसीं। अन्न घालावें तीनी वेळां॥ ११-४०॥

या ओळीचा अर्थ पुढीलप्रमाणे :-

पिंपळपानाच्या औषधाचा द्रवरुप सत्त्वांश तीन वेळा  पिंपळपानाचे चाटण बाळाला घालावे.

---------------------------------------------------------------

## ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

### अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

२) **अर्कवारी** = अर्क (सूर्य) + वारी= सूर्य वारी= रविवारी

रविवारी पिंपळपानावर तीनवेळा अन्न घालावे.

'औषध योजना ही नेहमी तज्ञ लोकांच्या मार्गदर्शनाखाली करावी, ही गोष्ट श्रीगुरुचरित्रकारांना अभिप्रेत असावी.' असे ह्या ओवीतील विशिष्ठ शब्दरचनेवरुन दिसते.

**वाचकांना नम्र विनंती पिंपळ पानाच्या चाटणाचे प्रयोग स्वतःवर किंवा अन्य जीवांवर करु नयेत.**

*तज्ञ लोक 'पिंपळ पान अर्का'च्या संशोधनाद्वारे सदर ओवीवर निश्चित प्रकाश टाकू शकतील.*